‖ वर्ष - 8 । अंक -172 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖

2025
नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 1 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## नवीन वर्षात उद्धव ठाकरे यांना पुण्यातून मोठा धक्का

# मुंबईकडे लक्ष, पुण्याकडे दुर्लक्ष!

## ❯❯ शिवसेना UBTला मोठं खिंडार; ठाकरेंचे कार्यकर्ते भाजपच्या वाटेवर

। पुणे । महाईन्यूज

**एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्षात फूट पाडून मूळ शिवसेनेवर दावा केला. त्यानंतर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला लागलेला सुरंग काही थांबता थांबत नाहीये. पुण्यात संजय राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीनंतर शिवसेनेचा एक आक्रमक नेता आणि माजी आमदाराने पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला आहे. ठाकरेंच्या या नेत्यासोबत उबाठाचे ५० कार्यकर्ते आणि पदाधिकारी भाजपच्या वाटेवर असल्याची माहिती आहे. त्यामुळे पुण्यात शिवसेना उबाठाला मोठं खिंडार पडणार आहे.**



पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडून कोणतीही मदत मिळत नासल्यासामुळे नेते आता शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे आणि शिवसेना उबाठाला जय महाराष्ट्र करत आहेत. त्यामुळे पुण्यातून शिवसेना उबाठाला मोठा धक्का बसणार असं चित्र पाहायला मिळत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेनेचे कार्यरत असलेले आक्रमक नेते सुरज लोखंडे यांनी प्रसार माध्यमांमध्ये जाहीर केलेला संदेश हा सगळीकडे पसरला आहे. नवीन वर्ष संपण्यापूर्वी उद्धव ठाकरे यांचे पुण्यातले पाच नगरसेवक जय महाराष्ट्र करण्याच्या तयारीत आहेत, असं त्यांनी सांगितलं.

येत्या ५ जानेवारीला मुंबई येथे ठाकरेंचे ५ माजी नगरसेवक ज्यामध्ये विशाल धनवडे, बाळा ओसवाल यांचाही समावेश आहे. त्यांच्यासह ४ नगरसेवक हे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित भाजप पक्षात येथे प्रवेश करणार आहेत. मुंबईत ते भाजपमध्ये प्रवेश घेतील. त्यामुळे पुण्यात शिवसेनेला मोठं खिंडार पडणार आहे. या संदर्भातला एक मेसेज व्हॉट्सअॅपवर शेअर होतो आहे.

सूरज लोखंडे यांच्या नावे असा मेसेज सध्या व्हॉट्सअॅपवर शेअर होतो आहे. आता उद्धव ठाकरे आपल्या कार्यकर्त्यांना थांबवण्यासाठी काही करतात हा हे पाहावं लागणार आहे.

उद्धव ठाकरे यांचे पुण्यात लक्ष नाही. त्यामुळे माजी नगरसेवक अस्वस्थ झाले आहेत. त्यातील पाच जणांना भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. हे सर्व जण मुंबईत पाच जानेवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते असलेले उद्धव ठाकरे यांना नवीन वर्षांत जोरदार धक्का बसणार आहे. विधानसभा निवडणुकीत आलेल्या अपयशानंतर उद्धव ठाकरे यांच्या पुण्यातील गडाला सुरंग लागणार असल्याची चिन्ह निर्माण झाली आहे. पुणे येथील पाच माजी नगरसेवक उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला सोडणार आहे. ते सर्व भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उद्धव ठाकरे यांना हा मोठा झटका असणार आहे.

### निष्ठावंत शिवसैनिक दुसऱ्या पक्षात जाणार...

उद्धवसाहेब, जय महाराष्ट्र

पुण्यातील शिवसेना का होणार उध्वस्त.... कित्येक नगरसेवक जाणार दुसऱ्या पक्षात... मुंबईकडे लक्ष देता देता पुण्यातील शिवसेनेकडे झाले दुर्लक्ष.... शिवसेना फुटली... लाटा आल्या.. आघाड्या झाल्या.. युत्या झाल्या... वेगळे लढलो... अनेक आमदार खासदार गेले.......... तरी कधी पुण्यातील शिवसैनिक डगमगला नाही. पण, काही दिवसांत पुण्यातील शिवसैनिकांमध्ये मोठा भूकंप होणार आणि अनेक निष्ठावंत शिवसैनिक दुसऱ्या पक्षात जाणार...

जय महाराष्ट्र

**- आपला शिवसैनिक सूरज लोखंडे**

### पालिका निवडणुकीत होणार अडचण

पुण्यात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाला मोठा धक्का बसणार आहे. भाजपकडून हा झटका उद्धव ठाकरे यांना देण्यात येणार आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे ५ माजी नगरसेवक भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची चिन्ह निर्माण झाली आहे. राज्य सरकार यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात भूमिका मांडणार आहे. त्यामुळे राज्यातील विविध पक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी मोर्चा बांधणी करण्यास लागले आहे. त्यावेळी शिवसेना उबाठाला पुण्यात धक्का बसणार आहे. आगामी पालिका निवडणुकीच्या तोंडावर ठाकरे यांना हा मोठा धक्का समजला जात आहे.

## कोरेगाव भीमा 207 वा शौर्यदिन

## ❯❯ विजयस्तंभाला आकर्षक सजावट, लाखो अनुयायी अभिवादनासाठी दाखल

। पुणे । महाईन्यूज

तब्बल वीस गुंठे जागेमध्ये असलेला ७५ फुटी ऐतिहासिक विजयीस्तंभ यावर्षी कृत्रिम व खऱ्या फुलांनी सजविण्यात आला आहे. या स्तंभावर फुलांनी अशोकचक्र, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आणि संविधानाचे तैलचित्र लक्ष वेधून घेत



आहे . पुण्यातील कोरेगाव भीमा येथे आज 207 वा शौर्यदिन साजरा केला जात आहे. कोरेगाव भीमा इथल्या विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी लाखो अनुयायींनी गर्दी केली आहे. त्यासोबतच या ऐतिहासिक विजय स्तंभाला आकर्षक फुलांची सजावटही करण्यात आली आहे. पुण्यातील कोरेगाव भीमा या ठिकाणी शौर्य दिनानिमित्त जय्यत तयारी करण्यात आली आहे. तसेच पोलिसांचा देखील तगडा बंदोबस्त पाहायला मिळत आहे. कोरेगाव भीमा या ठिकाणी 5 हजार पोलीस सुरक्षिततेसाठी तैनात करण्यात आले आहेत.

कोरेगाव भीमा येथे 207 व्या शौर्यदिनी ऐतिहासिक विजयस्तंभ शौर्यदिन कार्यक्रमानिमित्त प्रशासनाकडून नियोजनाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. यावर्षी भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवाच्या धर्तीवर ऐतिहासिक विजयस्तंभास फुलांची सजावट करण्यात आली आहे. त्यासाठी ७० हजार कृत्रिम आणि १ हजार किलो खऱ्या फुलांचा वापर करण्यात आला आहे. कोरेगाव भीमा येथील ऐतिहासिक विजयस्तंभास शौर्यदिनी होणाऱ्या मानवंदना कार्यक्रमादरम्यान या ठिकाणी मोठ्या प्रमाणात सजावट करण्यात येते.

# थर्टी फस्टसाठी पबकडून गर्भनिरोधकांचे वाटप!

## राज्य महिला आयोगाकडून प्रकरणाची घेण्यात आली गंभीर दखल

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**असं म्हणतात पुणे तिथे काय उणे, याच पुण्यातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तो म्हणजे पुण्यातील एका पबनं थर्टी फस्टच्या सेलिब्रेशनचं निमंत्रण देताना चक्क गर्भनिरोधक (कंडोम) आणि ओआरएसच्या पाकिटांचं वाटप केलं. या प्रकाराची चांगलीच चर्चा रंगली, त्यानंतर आता राज्य महिला आयोगाकडून या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली आहे.**



राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी ट्विट करत याबाबत माहिती दिली आहे. राज्यात सर्वत्र थर्टी फस्टचा उत्साह आहे, नव वर्षाच्या स्वागतासाठी लोक अतुर झालेले आहेत. नव वर्षाचं स्वागत कसं करायचं याचं प्रत्येक जण प्लॅनिंग बनवत असतो. आपलं सेलिब्रेशन हे इतरांपेक्षा युनिक पद्धतीनं झालं पाहिजे यावर देखील अनेकांचा भर असतो. काही जण घरातच नव वर्षाचं सेलिब्रेशन करतात तर काही जण हॉटेल, पब अशा महागड्या ठिकाणी जाऊन नव वर्षाचं स्वागत करतात. अनेक जण तर नव वर्षाच्या स्वागतासाठी कुठे एखाद्या दूरवरच्या पर्यटनस्थळी जाण्याचा बेत देखील आखतात. दरम्यान या काळात हॉटेल आणि पबला देखील मोठी मागणी असल्यामुळे आपल्याकडे गर्दी खेचण्यासाठी किंवा चर्चेत येण्यासाठी अशा हॉटेल आणि पबकडून देखील वेगवेगळ्या युक्त्यांचा वापर केला जातो. सध्या पुण्याच्या मुंढवा परिसरात असलेला हाय स्पिरीट पब चांगलाच चर्चेत आला आहे. या पबकडून थर्टी फस्टचं आमंत्रण देताना चक्क गर्भनिरोधकांचे (कंडोम) आणि ओआरएसची पाकिटं वाटण्यात आली. त्यानंतर आता राज्य महिला आयोगाकडून या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली आहे.पुण्यातील मुंढवा परिसरातील हाय स्पिरीट पबकडून गैरकृत्य केल्याबाबतची बातमी माध्यमातून समोर आली आहे. याची दखल घेत राज्य महिला आयोगाने पुणे पोलीस आयुक्तांना सदर प्रकरणी तथ्य जाणून वस्तुस्थितीदर्शक अहवाल आयोगास सादर करण्याचे निर्देश दिले आहेत, असं ट्विट रुपाली चाकणकर यांनी केलं आहे.पुणे तिथे काय उणे, याच पुण्यातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तो म्हणजे पुण्यातील एका पबनं थर्टी फस्टच्या सेलिब्रेशनचं निमंत्रण देताना चक्क गर्भनिरोधक (कंडोम) आणि ओआरएसच्या पाकिटांचं वाटप केलं. या प्रकाराची चांगलीच चर्चा रंगली, त्यानंतर आता राज्य महिला आयोगाकडून या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी ट्विट करत याबाबत माहिती दिली आहे. राज्यात सर्वत्र थर्टी फस्टचा उत्साह आहे, नव वर्षाच्या स्वागतासाठी लोक अतुर झालेले आहेत. नव वर्षाचं स्वागत कसं करायचं याचं प्रत्येक जण प्लॅनिंग बनवत असतो. आपलं सेलिब्रेशन हे इतरांपेक्षा युनिक पद्धतीनं झालं पाहिजे यावर देखील अनेकांचा भर असतो.

### हाय स्पिरीट पबकडून गैरकृत्य

काही जण घरातच नव वर्षाचं सेलिब्रेशन करतात तर काही जण हॉटेल, पब अशा महागड्या ठिकाणी जाऊन नव वर्षाचं स्वागत करतात. अनेक जण तर नव वर्षाच्या स्वागतासाठी कुठे एखाद्या दूरवरच्या पर्यटनस्थळी जाण्याचा बेत देखील आखतात. दरम्यान या काळात हॉटेल आणि पबला देखील मोठी मागणी असल्यामुळे आपल्याकडे गर्दी खेचण्यासाठी किंवा चर्चेत येण्यासाठी अशा हॉटेल आणि पबकडून देखील वेगवेगळ्या युक्त्यांचा वापर केला जातो. सध्या पुण्याच्या मुंढवा परिसरात असलेला हाय स्पिरीट पब चांगलाच चर्चेत आला आहे. या पबकडून थर्टी फस्टचं आमंत्रण देताना चक्क गर्भनिरोधकांचे (कंडोम) आणि ओआरएसची पाकिटं वाटण्यात आली. त्यानंतर आता राज्य महिला आयोगाकडून या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली आहे.पुण्यातील मुंढवा परिसरातील हाय स्पिरीट पबकडून गैरकृत्य केल्याबाबतची बातमी माध्यमातून समोर आली आहे.

# लोणावळा - खंडाळ्यात पर्यटकांची झुंबड

## शहरातून जाणाऱ्या जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर वाहनांच्या रांगा

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**नववर्ष स्वागतासाठी लोणावळा, खंडाळा परिसरात मोठ्या संख्येने पर्यटक दाखल झाले. जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर, तसेच लोणावळा, खंडाळ्यात ठिकठिकाणी कोंडी झाल्याचे पाहायला मिळाले. मोठ्या संख्येने पर्यटक दाखल झाल्याने शहरभर कोंडी झाली.**





नववर्ष स्वागतासाठी मंगळवारी सकाळपासून मुंबई, पुण्यातील पर्यटकांची लोणावळा, खंडाळा परिसरात गर्दी झाली. अनेकजण सहकुटुंब मोटारीतून दाखल झाले. मोठ्या संख्येने मोटारी रस्त्यावर आल्याने जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर खंडाळा परिसरात कोंडी झाली, तसेच लोणावळ्यातील गवळी वाडा परिसरात कोंडी झाल्याचे पाहायला मिळाले. खंडाळा गाव ते पोलीस प्रशिक्षण केंद्र दरम्यान वाहनांच्या रांगा लागल्या. त्यामुळे मुंबईकडे जाणाऱ्या वाहनचालकांना कोंडीत अडकून पडावे लागले. लोणावळा शहरातून जाणाऱ्या जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या.अनेक पर्यटकांनी लोणावळा, खंडाळा परिसरातील बंगले, फार्म हाऊस आरक्षित केले होते. पवनानगर भागातील तंबू आरक्षित करण्यात आले होते. पर्यटकांचे स्वागत, तसेच मनोरंजनासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. लोणावळा, खंडाळ्यातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. वाहतूक नियोजन करण्यासाठी स्वतंत्र पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला. मोठ्या संख्येने पर्यटक मोटारीतून दाखल झाल्याने ठिकठिकाणी कोंडी झाल्याची माहिती लोणावळा पोलिसांनी दिली.नववर्ष स्वागतासाठी मंगळवारी सकाळपासून मुंबई, पुण्यातील पर्यटकांची लोणावळा,

### खंडाळ्यात ठिकठिकाणी कोंडी

पवनानगर भागातील तंबू आरक्षित करण्यात आले होते. पर्यटकांचे स्वागत, तसेच मनोरंजनासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. लोणावळा, खंडाळ्यातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. वाहतूक नियोजन करण्यासाठी स्वतंत्र पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला. मोठ्या संख्येने पर्यटक मोटारीतून दाखल झाल्याने ठिकठिकाणी कोंडी झाल्याची माहिती लोणावळा पोलिसांनी दिलीजुन्या मुंबई-पुणे महामार्गावर, तसेच लोणावळा, खंडाळ्यात ठिकठिकाणी कोंडी झाल्याचे पाहायला मिळाले. मोठ्या संख्येने पर्यटक दाखल झाल्याने शहरभर कोंडी झाली.

खंडाळा परिसरात गर्दी झाली. अनेकजण सहकुटुंब मोटारीतून दाखल झाले. मोठ्या संख्येने मोटारी रस्त्यावर आल्याने जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर खंडाळा परिसरात कोंडी झाली, तसेच लोणावळ्यातील गवळी वाडा परिसरात कोंडी झाल्याचे पाहायला मिळाले. खंडाळा गाव ते पोलीस प्रशिक्षण केंद्र दरम्यान वाहनांच्या रांगा लागल्या. त्यामुळे मुंबईकडे जाणाऱ्या वाहनचालकांना कोंडीत अडकून पडावे लागले. लोणावळा शहरातून जाणाऱ्या जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या.अनेक पर्यटकांनी लोणावळा, खंडाळा परिसरातील बंगले, फार्म हाऊस आरक्षित केले होते.

## राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने केली प्रक्रिया सुरू

# निवडणुकांचे बिगुल नववर्षाच्या सुरुवातीला!

### गृहनिर्माण संस्थांच्या लांबणीवर पडलेल्या निवडणुकींना नवीन वर्षाचा मुहुर्त !

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आधी लोकसभा निवडणूक, नंतर पावसाळा आणि नंतर विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे वर्षभर रखडलेल्या राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल नववर्षाच्या सुरुवातीला वाजणार आहे. राज्य सरकारने राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांसह इतर सहकारी संस्थांच्या निवडणुकांना ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत स्थगिती दिली होती. त्याची मुदत संपत असल्याने नव वर्षात बुधवार दि. १ जानेवारी २०२५ पासून रखडलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण प्रक्रिया सुरू करणार आहे.**




दरम्यान, पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील विविध गृहनिर्माण सोसायटींमधील कार्यकारी समितींचा कार्यकाळ संपलेला आहे. निवडणूक प्रक्रिया सुरू झाली असून, राज्य शासनाच्या सहकार विभागाने दिलेल्या 'जैसे थे स्थगिती'मुळे प्रक्रिया थांबवण्यात आली होती. आता दि. १ जानेवारीपासून निवडणूक प्रक्रिया सुरू होईल, अशी विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे. सहकारी संस्थांच्या निवडणुकांच्या स्थगितीला मुदतवाढ दिली जाणार नसल्याने निवडणूक प्रक्रिया सुरू करण्याबाबत राज्य सहकार विभागाने निवडणूक प्राधिकरणाला सूचनाही दिल्या आहेत. निवडणुकीस पात्र सर्व प्रकारच्या सहकारी संस्था, प्रशासक, प्रशासक मंडळ नियुक्त केलेल्या सहकारी संस्था, हंगामी समितीचा कालावधी संपुष्टात आलेल्या सहकारी संस्था यांच्या निवडणूक प्रक्रिया १ जानेवारीपासून सुरू होणार आहेत. यात गृहनिर्माण संस्थांसह दूध संघ, बाजार समिती, जिल्हा बँक व पतसंस्थांचा समावेश असेल. न्यायालयाने प्रतिबंध केला आहे, त्या सहकारी संस्थांच्या निवडणुका मात्र घेण्यात येणार नाहीत.'

२०२४-२५ या वर्षात राज्यातील २९,४२९ सहकारी संस्थांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. त्यापैकी ७,१०९ सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया ऑक्टोबर महिन्यात सुरू करण्यात आली होती. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक पूर्वतयारीसाठी तसेच प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेच्या कामकाजासाठी सहकार विभागातील अधिकारी, कर्मचारी यांची सेवा अधिग्रहित करू शकतात. त्यामुळे सहकारी संस्थांच्या निवडणुका पार पाडण्यात अडचणी येऊ शकतात, ही बाब लक्षात घेऊन सहकार विभागाने ७ ऑक्टोबर २०२४ रोजी सहकारी संस्थांच्या निवडणुकांना ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत स्थगिती देण्याचा निर्णय घेतला होता.

#### वर्षात तीनदा स्थगिती

– लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १ मार्च रोजी सहकारी संस्थांच्या निवडणुकीला ३१ मे पर्यंत स्थगिती.
– राज्यातील पावसाची परिस्थिती विचारात घेऊन २० जून रोजी सहकारी संस्थांच्या निवडणुकीला ३० सप्टेंबरपर्यंत स्थगिती.
– विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ७ ऑक्टोबर रोजी सहकारी संस्थांच्या निवडणुकीला ३१ डिसेंबरपर्यंत स्थगिती.

#### प्राधिकरणाला सूचनाही दिल्या आहेत

निवडणूक प्रक्रिया सुरू झाली असून, राज्य शासनाच्या सहकार विभागाने दिलेल्या 'जैसे थे स्थगिती'मुळे प्रक्रिया थांबवण्यात आली होती. आता दि. १ जानेवारीपासून निवडणूक प्रक्रिया सुरू होईल, अशी विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे.सहकारी संस्थांच्या निवडणुकांच्या स्थगितीला मुदतवाढ दिली जाणार नसल्याने निवडणूक प्रक्रिया सुरू करण्याबाबत राज्य सहकार विभागाने निवडणूक प्राधिकरणाला सूचनाही दिल्या आहेत.

---

## गो-संवर्धनासाठी पुण्यात ओंकारेश्वराची महाआरती!

### महाआरतीसाठी कॅबिनेट मंत्री नितेश राणे, आमदार महेश लांडगे यांची उपस्थिती

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात गोहत्या बंदी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि गोरक्षकांच्या मागण्यांसाठी महायुती सरकारकडे पाठपुरावा करणार आहोत. तसेच, या पुढील काळातही गोसंवर्धनासाठी शेती-माती-संस्कृतीसाठी कटिबद्ध आहोत. कायदा असतानाही गोहत्या केली जात असेल, तर भगवाधारी महायुतीच्या सरकारमध्ये कुणाचेही लांगुलचालून करु देणार नाही.**




कायदा प्रत्येकाला पाळावा लागेल, असा इशारा राज्याचे कॅबिनेट मंत्री नितेश राणे यांनी दिला आहे. महाराष्ट्रात महादेवाच्या नंदींचे व गोमातेच्या रक्ताचे वाहणारे पाट थांबवून शेतकरी समृद्ध व्हावेत. यासाठी पुण्याचे आराध्य दैवत भगवान श्री. ओंकारेश्वराच्या प्राचीन मंदिरात महाआरती करण्यात आली. राज्यातील गोरक्षक, गोभक्त आणि गोसेवकांच्या वतीने महादेवासमोर गोरक्षण व गोसंवर्धनासाठी संकल्प केला. यावेळी राज्याचे कॅबिनेट मंत्री नितेश राणे, आमदार महेश लांडगे आणि मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये महाआरती संपन्न झाली. महाआरतीचे नियोजन गोरक्षक शिवशंकर स्वामी, सोमनाथ भोसले यांनी केले होते. कॅबिनेट मंत्री नितेश राणे म्हणाले की, गोमातेकडे कुणीही वाकड्या नजरेने बघण्याची हिंमत होणार नाही. हिंदू म्हणून थाटात फिरा. कुणाला घाबरण्याची आवश्यकता नाही. जो अधिकारी गाईच्या कत्तलीला प्रोत्साहन देत असेल, त्याचे फक्त नाव द्या. गाईला राज्यमातेचा दर्जा देणारे महायुती सरकार आहे. गोरक्षकांनी आता चिंता करण्याची आवश्यकता नाही. गोहत्या बंदीचा कायदा आणखी कडक करण्यासाठीसुद्धा आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी करणार आहोत. आगामी काळात महाराष्ट्राला कत्तलखानामुक्त करणार आहोत, असेही नितेश राणे यांनी म्हटले आहे.

> "आमची सगळी मुलं गोरक्षणासाठी दिवस रात्र पळत आहेत. हिंदुत्वाचा विचार जपत गो-सेवक नि:स्वार्थपणे काम करीत आहेत. हिंदू धर्मातील आठरा पगड जाती, बारा बलुतेदार या सर्वांना सोबत घेवून देव-देश अन् धर्म रक्षणासाठी कटिबद्ध आहोत. गोमातेच्या रक्षणासाठी जीव धोक्यात घालून काम करणारे गोरक्षक यांच्या पाठीशी महायुती सरकार राहणार आहे.
> – **महेश लांडगे,** आमदार, भाजपा.



# करडचं गुंडाळलं बिऱ्हाड, सगळंच गुंडगिरीचं वऱ्हाड !



**वाल्याचा वाल्मिकी झाल्याचा संदर्भ आपण रामायणात वाचतो. संदर्भ कसला ? अहो, वाल्मिकींनंच रामायण लिहिलं. पुन्हा जुने संदर्भ येतील, टीकाकार जागे होतील.. त्यात रामायण घडलं का? खरंच वाल्मिकी ऋषी होऊन गेले का? एक ना दोन असे अनेक प्रश्न वाचकांपुढं येऊन जातील..यातील एक संदर्भ एवढ्यासाठीच घ्यायचा, की चांगल्या प्रवृत्तीचं प्रतिनिधित्व करणारा तो वाल्मिकी..आणि गुंड, खंडणीखोर खुन्यांचं प्रतिनिधित्व करणारा तो वाल्या !**

'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

आता, हा संदर्भ समोर येण्याचं मुख्य कारण म्हणजे बीड जिल्ह्यात केज तालुक्यातल्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण ! ही हत्या बीड जिल्ह्यावर घट्ट पकड असणाऱ्या वाल्मीक कराडनं केल्याचा आरोप प्रत्येक जण करतो आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यापासून कोल्हापूरच्या संभाजीराजांपर्यंत सगळ्यांचा अंगुलीनिर्देश हा या वाल्मीक कराडकडंच आहे. स्थानिक सर्व नेते, शरद पवार गट, काँग्रेस नेते आणि उद्धव ठाकरे गटाचे नेते म्हणजेच महाविकास आघाडीच्या सर्वांनी संशयाची सुई वाल्मीक कराडकडं केली आहे. अर्थात्, तो कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांचा 'उजवा हात' असल्यानं ते त्याला पाठीशी घालत असून त्यांच्या राजीनाम्याची देखील मागणी झाली आहे, हे वेगळं सांगायला नको.

बीड जिल्हा हा गुंडगिरी आणि खंडणीसाठी महाराष्ट्रात सर्वात कुख्यात म्हणून ओळखला जातो. वाळू माफिया बरोबर परळी येथील प्रकल्पांमधून बाहेर पडणारी राख यांच्या तस्करीसाठीही तो कुप्रसिद्ध आहे. त्यातूनच मग जिल्ह्यामध्ये गुंडगिरी आणि खंडणीखोरांच्या टोळ्या फोफावल्या आहेत. सध्या या सर्व गुन्हेगारी जगताचे धागेदोरे वाल्मीक कराडकडं असल्याचं बोललं जातं. आता पुन्हा मुख्य प्रश्न येतो, तो म्हणजे हा वाल्मीक कराड आहे तरी कोण?

### एकेकाळी गोपीनाथ मुंडेंकडे घरगडी !

वाल्मीक कराडचा थोडासा इतिहास तपासला, तर तो भारतीय जनता पार्टीचे तत्कालीन ज्येष्ठ नेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या घरी घरगडी म्हणून काम करत होता. नंतरच्या काळात तो गोपीनाथ मुंडे यांचे पुतणे धनंजय मुंडे यांच्यासोबत गेला आणि बघता बघता बीड जिल्ह्याचा 'कारभारी' झाला. आत्ताची अवस्था अशी आहे, की त्याच्या आदेशाशिवाय किंवा त्याला सांगितल्याशिवाय बीड जिल्ह्यातील इकडची काडी तिकडे हलत नाही ! मोठमोठ्या टेंडर्स पासून ते राजकीय आणि सामाजिक जुळवाजुळवी पर्यंत प्रत्येक ठिकाणी वाल्मीक कराडची 'एन ओ सी' (नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट) लागते, हे लक्षात घ्या म्हणजे त्याचा वकूब आणि त्याची ताकद लक्षात येईल. अर्थात हे तिथं दबक्या आवाजात बोललं जातं!

### सर्वपक्षीय नेत्यांशी अगदी जवळचे संबंध..

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी वाल्मीक कराड याच्यावर आरोप करताना मोठमोठ्या नेत्यांबरोबरचे त्याचे फोटो दाखवले आहेत. त्यात शरद पवार, सुप्रिया सुळे, रोहित पवार यांच्याप्रमाणेच काँग्रेस आणि भाजपाचे अनेक नेते .. शिवाय राज ठाकरे यांच्या स्वागतासाठी त्यानं केलेली फुलांची उधळण.. यांचाही समावेश आहे. त्यामुळं, वाल्मीक कराड मोठा कसा झाला? नेमका कोणामुळं मोठा झाला, हा प्रश्न आता गौण आहे! संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर वाल्मीक आणि त्याचं टोळकं फरारी झालं होतं. सीआयडी ची नऊ पथकं आणि तब्बल दीडशे पोलीस तपास करत होते. पण, आज २२ दिवसानंतर तो शरण आला आहे. बाकीचे आरोपी अजून मोकाटच आहेत, ही बाब महत्त्वाची !

### तपासाची एकूणच दिशा अन् दशा !

या देशमुख हत्येप्रकरणानंतर विरोधकांनी वाल्मीकवर टीकेची झोड उठवत, त्याचा आणि मंत्री धनंजय मुंडे यांचा अगदी जवळचा संबंध असल्याचा आरोप केला होता. मुंडे हेच त्याला वाचवत आहेत आणि त्यांनीच त्याला लपवून ठेवले असल्याचा आरोप देखील झाला होता. अखेर, वाल्मीकनं पुण्यात सीआयडीसमोर शरणागती पत्करली आहे. त्यानं स्वतःहून सीआयडी कार्यालयात हजर होऊन आत्मसमर्पण केलं. सीआयडीनंही त्यांची चौकशी सुरू केली आहे. आता, या प्रकरणातील ताजा घडामोडींवर लक्ष ठेवणं आवश्यक आहे, कारण या घटनेनं राज्यातील राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. वाल्मीकच्या शरणागतीनंतर या प्रकरणातील सत्यता उघड होण्याची शक्यता आहे, अनेक बड्या धेंडांची बिंगं फुटणार आहेत ! आत्तापर्यंत, देशमुख हत्या प्रकरणात तपासाला गती मिळाल्यानंतर चार आरोपींना अटक करण्यात आली आहे, तर तीन आरोपी फरार आहेत. या प्रकरणाचा तपास सीआयडीकडं असून, गेल्या काही दिवसांपासून वरिष्ठ अधिकारी बीड जिल्ह्यात तपासासाठी अड्डा टाकून आहेत. वाल्मीकचं नाव या प्रकरणात 'मास्टर माईंड' म्हणून घेतलं जात असल्यामुळं सीआयडीनं कराडच्या जवळच्या व्यक्तींची चौकशी करून महत्त्वाचे धागेदोरे मिळवले आहेत. तसेच, हत्या घडवून आणण्यासाठी कोणकोणत्या साधनांचा आणि व्यक्तींचा वापर झाला, याचा तपशील तपासला जात आहे. अगदी मुळापर्यंत घुसण्यात सीआयडी अधिकाऱ्यांना यश आलं आहे. वाल्मीकच्या चौकशीनंतर या प्रकरणातील मास्टरमाईंडची भूमिका, हत्येचं कारण आणि यामागील राजकीय किंवा वैयक्तिक वैर स्पष्ट होण्याची मोठी शक्यता आहे. सीआयडीनं या प्रकरणात कठोर कारवाई करत आरोपींवर कायदेशीर प्रक्रिया सुरू ठेवली आहे. या हत्याप्रकरणाशी संबंधित अन्य फरार आरोपी आता सीआयडीच्या रडारवर आहेत. फरार आरोपींची तसेच त्यांच्या नातेवाईकांची बँक खाती गोठवण्यात आली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार त्यांच्या मालमत्ता देखील 'सील' करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. एकूण शंभरपेक्षा जास्त खाती गोठवण्यात आली आहेत. सीआयडीच्या अधिकाऱ्यांनी आतापर्यंत दीडशे जणांची चौकशी केली आहे. या प्रकरणाशी संबंधित आणखी बऱ्याच जणांची चौकशी होणार आहे. वाल्मीकच्या दुसऱ्या पत्नीला देखील दररोज चौकशीसाठी बोलावलं जात आहे. या सर्वातून अनेक महत्त्वाची माहिती अधिकाऱ्यांच्या हाती येत असून वाल्मीकला आता बिऱ्हाड गुंडाळावं लागणार आहे, हे नक्की ! या प्रकरणातील आरोपींनी जे मोबाईल गाडीमध्ये सोडले होते, त्याचा फॉरेन्सिक डेटा हाती आल्यानंतर आणखी खुलासे होणारच आहेत. या वर्षाच्या शेवटच्या दिवशी वाल्मीक कराड हा सीआयडी अधिकाऱ्यांच्या ताब्यात आला असल्यामुळं नवीन वर्षात खूप काही चांगलं आणि आश्चर्यकारक ऐकायला मिळणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासाठी हे नवीन वर्ष अतिशय आव्हानात्मक असून अशा अनेक गैरकृत्यांचा छडा त्यांच्याकडं असलेल्या गृह खात्याला लावायचा आहे आणि त्यात ते वाकबगार आहेत, हे निश्चित !

### वाल्मीक कराड आहे तरी कोण?

संतोष देशमुख हे केवळ एक युवा सरपंचच नव्हे, तर समाजासाठी कार्यशील व्यक्तिमत्व होते. त्यांच्या हत्येसंदर्भात चर्चेत आलेले नाव म्हणजे वाल्मीक कराड! वाल्मीक कराड परळी मतदारसंघातील एक प्रभावशाली राजकीय व्यक्तिमत्व. ते परळी नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष होते आणि सध्या मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात. गेल्या दहा वर्षांपासून, परळी मतदारसंघातील प्रशासन आणि राजकीय कार्याचा मुख्य कारभार ते पाहत आहेत. भाजपाचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्यापासून बाजूला झाल्यानंतर, ते धनंजय मुंडेंच्या नेतृत्वाखाली काम करू लागले. धनंजय मुंडेंच्या अनुपस्थितीत, परळी मतदारसंघातील समस्या सोडविण्यात त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आणि प्रतिष्ठेची समजली जाते. वाल्मीकचे नाव आक्षेपार्ह गुन्हेगारी प्रकरणांमध्ये जोडले गेले आहे. 307 (खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा) यासारखे गंभीर स्वरूपाचा गुन्हा नोंदवला गेला होता. आता संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणात कराड यांचे नाव समोर आले आहे. देशमुख खूनप्रकरणातील मुख्य आरोपी विष्णू चाटे हा वाल्मीक च्या इशाऱ्यांवर काम करायचा. वाल्मीकची ओळख परळी मतदारसंघात धनंजय मुंडेंच्या खांद्याला खांदा लावून काम करणारा नेता अशी आहे, परंतु त्याचे नाव वारंवार गुन्हेगारी प्रकरणांत येत असल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगल्या आहेत. बीड जिल्ह्यामध्ये मराठा विरुद्ध ओबीसी हा राजकीय संघर्ष मोठा आहे आणि त्यातील ओबीसी समाजाचे नेतृत्व वाल्मीक कराड यांच्याकडे आहे.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कराड सीआयडी कार्यालयात शरण!

## हत्या प्रकरण : जुजबी चौकशी, मग बीडला रवानगी

। बीड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण पद्धतीने हत्या झाल्याने महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे. या हत्येनंतर महाराष्ट्रातील सर्वपक्षीयांनी एकत्र येत बीड येथे आक्रोश मोर्चा काढला होता. देशमुख यांच्या हत्या प्रकरणाशी संबंधित खंडणी केसमधील आरोपी वाल्मिक कराड मंगळवारी पुण्यातील सीआयडी कार्यालयात शरण आला. कराडनं सीआयडीच्या मुख्यालयात आत्मसमर्पण केलं. त्यानंतर त्याची अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्यात आली. आता त्याला बीडच्या डीवायएसपींनी ताब्यात घेतलं आहे. सीआयडीच्या बीड युनिटनं कराडला ताब्यात घेतलं आहे.**



पुण्यातील सीआयडीच्या अधिकाऱ्यांनी वाल्मिक कराडच्या चौकशीनंतर माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी अतिशय त्रोटक माहिती दिली. आज सकाळी साडे बाराच्या सुमारास वाल्मिक कराड पोलिसांसमोर हजर झाला. केजमधील खंडणी प्रकरणातील आरोपी असलेला कराड गेल्या काही दिवसांपासून फरार होता. आज त्याची जुजबी चौकशी करण्यात आली, अशी माहिती सीआयडीच्या अधिकाऱ्यांनी पुण्यात पत्रकारांना दिली. बीडमधील सीआयडी युनिटचे डीवायएसपी अनिल गुजर यांच्या ताब्यात वाल्मिक कराडला देण्यात आलं आहे. त्याला घेऊन पोलीस बीडच्या दिशेनं रवाना झालेले आहेत. ते बीडमध्ये कराडची अधिक चौकशी करतील', अशी माहिती सीआयडीच्या अधिकाऱ्यांनी दिली. कराडची पुढील चौकशी बीडमध्येच होणार आहे. गेल्या काही दिवसांपासून बीडमधील परिस्थिती तणावपूर्ण बनली आहे. वाल्मिक कराड आज दुपारी साडेबाराच्या सुमारास पुण्यात सीआयडीच्या मुख्यालयात हजर झाला. त्यावेळी त्याच्यासोबत दोन माजी नगरसेवक होते. कराड एका पांढऱ्या कारमधून सीआयडीच्या कार्यालयात हजर झाला. त्यानं आत्मसमर्पण केलं. त्याआधी त्यानं सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला. माझ्यावरील आरोप खोटे आहेत. राजकीय हेतूनं ते करण्यात आलेले आहेत. माझ्यावर जामीनपात्र गुन्हा दाखल आहे. पण तरीही अटकपूर्व जामिनासाठी अर्ज न करता मी सीआयडीसमोर हजर होणार आहे, कोर्टात जर सिद्ध झाले तर आपण देईल ती शिक्षा भोगायला तयार असल्याचे वाल्मिकी कराड यांनी म्हटले आहे. सीआयडीने वाल्मिक कराडला बीडच्या दिशेला नेले आहे. याप्रकरणी सीआयडीची विनंती केज कोर्टाने मान्य केली आहे. त्यामुळे रात्री उशिरा वाल्मिक कराडच्या रिमांडवर कोर्टात सुनावणी होणार आहे. केज कोर्टातल्या कोर्ट नंबर १३ मध्ये वाल्मिक कराडला हजर केले जाणार आहे. सीआयडीच्या अधिकाऱ्यांनी कोर्टात येऊन आज रात्री उशिरा कोर्ट चालवण्याची विनंती केली होती. सीआयडीची विनंती मान्य करत केज कोर्टात आजच रिमांडवर सुनावणी होणार आहे. देशमुख यांची निर्घृण हत्या झाल्यानंतर राज्यात विविध प्रकारे आंदोलने सुरु आहेत. आता राज्यातील २,२३९ ग्रामपंचायती तीन दिवस काम बंद आंदोलन करणार आहेत. वाशिम, यवतमाळ, गोंदियातील २,२३९ ग्रामपंचायती तीन दिवसांचे काम बंद आंदोलन पुकारले आहे. यवतमाळमधील १ हजार २०५, वाशिम जिल्ह्यातील ४९१ ग्रामपंचायती आणि गोंदियातील ५४३ ग्रामपंचायती बंद असणार आहेत. आरोपींना अटक करण्यासाठी जर ग्रामपंचायती बंद करण्याची वेळ येत असेल सरकारचा काय उपयोग असा सवाल मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. पुण्यातील सीआयडीच्या अधिकाऱ्यांनी वाल्मिक कराडच्या चौकशीनंतर माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी अतिशय त्रोटक माहिती दिली. आज सकाळी साडे बाराच्या सुमारास वाल्मिक कराड पोलिसांसमोर हजर झाला. केजमधील खंडणी प्रकरणातील आरोपी असलेला कराड गेल्या काही दिवसांपासून फरार होता. आज त्याची जुजबी चौकशी करण्यात आली, अशी माहिती सीआयडीच्या अधिकाऱ्यांनी पुण्यात पत्रकारांना दिली. बीडमधील सीआयडी युनिटचे डीवायएसपी अनिल गुजर यांच्या ताब्यात वाल्मिक कराडला देण्यात आलं आहे.

### ग्रामपंचायती तीन दिवस बंद!

सुरेश धस यांनी प्राजक्ता माळी यांची माफी मागितली आहे. प्राजक्ता माळी यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्याप्रकरणी सुरेश धस यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर बोलताना आमदार सुरेश धस यांनी अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्या नावाचा उल्लेख केला होता. यावरून वातावरण चांगलंच तापलं होतं. त्यानंतर प्राजक्ता माळी यांनी पत्रकार परिषद घेऊन सुरेश धस यांनी आपली माफी मागवी अशी मागणी केली होती. मात्र मी काही चुकीचं बोललो नाही, प्राजक्ता ताईंचा अपमान होईल असं बोललो नाही, मी माझ्या वक्तव्याचं समर्थन करतो त्यामुळे माफी मागणार नाही अशी भूमिका यावर सुरेश धस यांनी घेतली होती. मात्र त्यांनी आता प्राजक्ता माळी

# धनंजय मुंडेंचा राजीनामा घेणार का?

## संतोष देशमुख हत्या प्रकरण : देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली प्रतिक्रिया

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**संतोष देशमुख हत्या प्रकरणाचे पडसाद हे विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनातही उमटले. त्यानंतर सातत्याने एक नाव चर्चेत येत होतं ते नाव होतं वाल्मिक कराड. वाल्मिक कराड आज पुणे सीआयडी कार्यालयात शरण आले. त्यानंतर या प्रकणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. माध्यमांशी बोलत असताना फडणवीस म्हणाले,**

"संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील प्रत्येक आरोपीवर कडक कारवाई करण्यात येईल, हे मी पहिल्या दिवसांपासून सांगत आलो आहे. कुणालाही अशाप्रकारची हिंसा करण्याचा अधिकार नाही. सर्व दोषी जोपर्यंत फासावर लटकत नाहीत, तोपर्यंतची सर्व कारवाई पोलीस करतील." यावेळी त्यांना धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याविषयीही प्रश्न विचारला गेला त्याचंही उत्तर देवेंद्र फडणवीस यांनी दिलं.बीडमधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर चर्चेत आलेले वाल्मिक कराड हे आता पुण्यातील सीआयडी कार्यालयात पोलिसांना शरण आले आहेत. शरण येण्यापूर्वी त्यांनी स्वतःचा एक व्हिडीओ प्रसिद्ध केला



आहे. ज्यामध्ये त्यांनी स्वतःवरील सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. राजकीय द्वेषापोटी माझ्याविरोधात आरोप केले जात असून जर पोलिस तपासात मी दोषी आढळलो तर जी शिक्षा होईल, ती भोगण्यासाठी मी तयार असल्याचे ते म्हणाले आहेत. वाल्मिक कराड शरण आल्यानंतर विविध प्रतिक्रिया उमटल्या. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही याबाबत भाष्य केलं. विरोधकांकडून धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केली जाते आहे त्याबाबतही देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिलं.

### गुंडांचे राज्य चालू देणार नाही

कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांकडून सातत्याने केली जाते आहे. त्याबाबत विचारलं असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, "मला या प्रकरणातील राजकारणात जायचे नाही. मी आधीपासून सांगत आलो आहे की, जे पुरावे समोर येतील त्यानुसार कारवाई केली जाईल. माझ्याकरिता स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हत्येला कारणीभूत लोकांना शिक्षा होणे हे महत्त्वाचे आहे. काही लोकांना केवळ राजकारण महत्त्वाचे आहे. त्यांना त्यांचे राजकारण लखलाभ. मला कुठल्याही राजकारणात जायचे नाही. त्यांनी त्यांचे राजकारण करत राहावं.

गुंडांचे राज्य आम्ही चालू देणार नाही. कुणालाही अशाप्रकारे हिंसा करता येणार नाही, खंडणी मागता येणार नाही. त्या अनुषंगाने आम्ही तपासाला गती दिली असून त्यामुळेच वाल्मिक कराड यांना शरणागती पत्करावी लागली. आता हत्येतील फरार आरोपींना पकडण्यासाठी वेगवेगळी पथके कामाला लागली आहेत.

# ...तर मोदींना लाज वाटत असेल!

## राणेंच्या ‘मिनी पाकिस्तान’ वक्तव्यावरून काँग्रेसचा हल्लाबोल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेसचे सरचिटणीस केसी वेणुगोपाल यांनी मंगळवारी महाराष्ट्राचे भाजपाचे नेते आणि महायुती सरकारमधील मंत्री नितेश राणे यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याचा तीव्र शब्दात निषेध केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राणेंच्या वक्तव्याबद्दल जराही लाज वाटत असेल तर त्यांना तात्काळ त्यांना बडतर्फ करावे अशी मागणी त्यांनी केली आहे.**



“भाजपा ठराविक कालांतराने केरळ विरोधात जहरी वक्तव्य करण्यासाठी द्वेष पसरवणाऱ्या नेत्यांना पुढे करते. मिनी पाकिस्तान यासारख्या शब्दांचा वापर केल्याने त्यांच्या मनामध्ये केरळमधील लोकांबद्दल किती खोलपर्यंत द्वेष भरला आहे हे दिसून येते”, असे मत वेणुगोपाल यांनी आपल्या एक्स पोस्टमध्ये व्यक्त केले आहे.“संपूर्ण जगासाठी केरळ हे एक आदर्श राज्य आहे,ज्याने मानवी विकास निर्देशांकात विशेषतः शिक्षण, आरोग्य सेवा आणि रहाणीमानाचा स्तर यामध्ये अव्वल स्थान पटकावले आहे. हजार वर्षांपासून केरळ हे सर्व धर्म आणि पंथांच्या सांप्रदायिक सौहार्द आणि बंधुत्वाचे आदर्श उदाहरण ठरले आहे. समतावाद, सर्वसमावेशकता आणि सामाजिक न्यायाचा पुरस्कार करणाऱ्या श्री नारायण गुरू, चट्टम्पि स्वामीकल आणि महात्मा अय्यंकाली यांच्या भूमीसाठी अपमानास्पद भाषा वापरणे, हे भाजपा आपल्याच देशवासियांना कसे क्षुल्लक समजते याचे प्रतीक आहे”, असेही वेणुगोपाल म्हणाले आहेत. वेणुगोपाल यांनी त्यांच्या पोस्टमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर देखील हल्लाबोल केला आहे.“राणे यांच्या वक्तव्याबद्दल जर पंतप्रधान मोदींना जराही लाज वाटत असेल, तर त्यांनी तात्काळ त्यांना बडतर्फ करावे”. “केरळमधील जनता या कारणासाठी भाजपाला नाकारले आहे आणि भविष्यात कधी स्वीकारणारही नाहीत. त्यांना (भाजपा) या राज्यातील सौहार्दपूर्ण वातावरणाचे सौंदर्य समजत नाही”, असेही वेणुगोपाल म्हणाले आहेत.नितेश राणे यांनी पुण्यातील एका रॅलीदरम्यान केरळ राज्याचा उल्लेख ‘मिनी पाकिस्तान’ असा केला होता. तसेच त्यांनी काँग्रेस नते राहुल गांधी आणि प्रियांका गांधी हे दहशतवाद्यांच्या पाठिंबा मिळाल्याने येथे निवडून येतात अशा आशयाचे विधान केले होते. राणे यांच्या या विधानानंतर सर्व स्तरातून त्यांच्यावर टीकेची झोड उठवण्यात आली होती. वाद पेटल्यानंतर राणे यांनी आपल्या वक्तव्यावर स्पष्टीकरण देखील दिले आहे.“भाजपा ठराविक कालांतराने केरळ विरोधात जहरी वक्तव्य करण्यासाठी द्वेष पसरवणाऱ्या नेत्यांना पुढे करते. मिनी पाकिस्तान यासारख्या शब्दांचा वापर केल्याने त्यांच्या मनामध्ये केरळमधील लोकांबद्दल किती खोलपर्यंत द्वेष भरला आहे हे दिसून येते”, असे मत वेणुगोपाल यांनी आपल्या एक्स पोस्टमध्ये व्यक्त केले आहे.“संपूर्ण जगासाठी केरळ हे एक आदर्श राज्य आहे,ज्याने मानवी विकास निर्देशांकात विशेषतः शिक्षण, आरोग्य सेवा आणि रहाणीमानाचा स्तर यामध्ये अव्वल स्थान पटकावले आहे. हजार वर्षांपासून केरळ हे सर्व धर्म आणि पंथांच्या सांप्रदायिक सौहार्द आणि बंधुत्वाचे आदर्श उदाहरण ठरले आहे. समतावाद, सर्वसमावेशकता आणि सामाजिक न्यायाचा पुरस्कार करणाऱ्या श्री नारायण गुरू, चट्टम्पि स्वामीकल आणि महात्मा अय्यंकाली यांच्या भूमीसाठी अपमानास्पद भाषा वापरणे, हे भाजपा आपल्याच देशवासियांना कसे क्षुल्लक समजते याचे प्रतीक आहे”, असेही वेणुगोपाल म्हणाले आहेत. वेणुगोपाल यांनी त्यांच्या पोस्टमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर देखील हल्लाबोल केला आहे.“राणे यांच्या वक्तव्याबद्दल जर पंतप्रधान मोदींना जराही लाज वाटत असेल, तर त्यांनी तात्काळ त्यांना बडतर्फ करावे”. “केरळमधील जनता या कारणासाठी भाजपाला नाकारले आहे आणि भविष्यात कधी स्वीकारणारही नाहीत. त्यांना (भाजपा) या राज्यातील सौहार्दपूर्ण वातावरणाचे सौंदर्य समजत नाही”, असेही वेणुगोपाल म्हणाले आहेत.

### केरळ बंधुत्वाचे आदर्श उदाहरण

नितेश राणे यांनी पुण्यातील एका रॅलीदरम्यान केरळ राज्याचा उल्लेख ‘मिनी पाकिस्तान’ असा केला होता. तसेच त्यांनी काँग्रेस नते राहुल गांधी आणि प्रियांका गांधी हे दहशतवाद्यांच्या पाठिंबा मिळाल्याने येथे निवडून येतात अशा आशयाचे विधान केले होते. राणे यांच्या या विधानानंतर सर्व स्तरातून त्यांच्यावर टीकेची झोड उठवण्यात आली होती. वाद पेटल्यानंतर राणे यांनी आपल्या वक्तव्यावर स्पष्टीकरण देखील दिले आहे आरोग्य सेवा आणि रहाणीमानाचा स्तर यामध्ये अव्वल स्थान पटकावले आहे. हजार वर्षांपासून केरळ हे सर्व धर्म आणि पंथांच्या सांप्रदायिक सौहार्द आणि बंधुत्वाचे आदर्श उदाहरण ठरले आहे. समतावाद, सर्वसमावेशकता आणि सामाजिक न्यायाचा पुरस्कार करणाऱ्या श्री नारायण गुरू, चट्टम्पि स्वामीकल आणि महात्मा अय्यंकाली यांच्या भूमीसाठी अपमानास्पद भाषा वापरणे, हे भाजपा आपल्याच देशवासियांना कसे क्षुल्लक समजते याचे प्रतीक आहे.

# श्रीमंत आणि गरीब मुख्यमंत्री कोण?

## एन. चंद्राबाबू नायडू हे देशातील सर्वात श्रीमंत मुख्यमंत्री ठरले

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सने (ADR) जाहीर केलेल्या नव्या अहवालातून भारतातील मुख्यमंत्र्यांच्या संपत्तीचा तपशील समोर आला आहे. यानुसार भारतातील सर्वात श्रीमंत मुख्यमंत्री कोण? आणि गरीब मुख्यमंत्री कोण? याची माहिती समोर आली आहे. या अहवालानुसार राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सर्व मुख्यमंत्र्यांची सरासरी संपत्ती ५२.५९ कोटी एवढी आहे.**




वर्ष २०२३-२४ मध्ये सर्वसामान्य भारतीय नागरिकाचे राष्ट्रीय दरडोई उत्पन्न हे जवळपास १ लाख ८५ हजार ८५४ इतके आहे. तर मुख्यमंत्र्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न १३ लाख ६४ हजार ३१० एवढे आहे. देशातील ३१ मुख्यमंत्र्यांची संपत्ती एकूण १,६३० कोटी इतकी आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू हे देशातील सर्वात श्रीमंत मुख्यमंत्री ठरले आहेत. त्यांच्याकडे ९३१ कोटींची संपत्ती आहे. अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खांडू हे दुसऱ्या क्रमांकावर असून त्यांची संपत्ती ३३२ कोटी एवढी आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या हे तिसऱ्या स्थानावर असून त्यांची संपत्ती ५१ कोटी इतकी आहे.कर्जाच्या बाबतीत पेमा खांडू यांच्यावर सर्वाधिक म्हणजे १८० कोटींचे कर्ज आहे. तर सिद्धरामय्या यांच्यावर २३ कोटी तर नायडू यांच्यावर १० कोटींचे कर्ज आहे.याउलट सर्वात कमी संपत्ती असलेल्या मुख्यमंत्र्यांमध्ये पश्चिम बंगालच्या ममता बॅनर्जी यांचा क्रमांक वर लागतो. त्यांच्याकडे केवळ १५ लाखांची संपत्ती आहे. तर जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी ५५ लाखांची संपत्ती जाहीर केलेली आहे.

### फडणवीस यांची संपत्ती किती?

एडीआरने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १३ कोटी रुपयांची संपत्ती जाहीर केली आहे. तर त्यांच्यावर ६२ लाखांचे कर्ज आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार या दोघांकडेही एक कोटींची संपत्ती असून त्यांच्यावर कोणतेही कर्ज नाही.वर्ष २०२३-२४ मध्ये सर्वसामान्य भारतीय नागरिकाचे राष्ट्रीय दरडोई उत्पन्न हे जवळपास १ लाख ८५ हजार ८५४ इतके आहे.

# सलमान खानने गायलं २८ वर्षे जुनं गाणं



बॉलीवूड सुपरस्टार सलमान खानने जामनगरमध्ये त्याचा ५९ वा वाढदिवस साजरा केला. त्यानंतर, त्याने अंबानी कुटुंबाबरोबर रिलायन्सच्या जामनगर येथील रिफायनरीच्या २५ व्या वर्धापन दिनाच्या सोहळ्याला हजेरी लावली. सलमानने अंबानी कुटुंबातील सदस्यांशी संवाद साधला. त्यानंतर त्याचं आयकॉनिक सुपरहिट गाणं “ओ ओ जाने जाना” सादर केलं. इव्हेंटमधील एका व्हिडीओमध्ये सलमान कोकिलाबेन अंबानीसह सर्वांना हात जोडून अभिवादन करताना दिसत आहे. आणखी एका व्हिडीओ नीता अंबानींची आई पूर्णिमा दलाल सलमानला मिठी मारताना आणि त्याच्यावर प्रेमाचा वर्षाव करताना दिसल्या. या क्लिपमध्ये सलमान श्लोका अंबानीशी संवाद साधताना दिसत आहे. सलमान खान आणि अनंत अंबानी हे दोघे खूप चांगले मित्र आहेत. सलमानने यंदा त्याचा ५९ वा वाढदिवस जामनगरमध्ये साजरा केला, या सेलिब्रेशनला त्याचे जवळचे मित्र आणि कुटुंबीय उपस्थित होते. अंबानी कुटुंबाने सलमानच्या वाढदिवसानिमित्त भव्य आयोजन केलं होतं. या सोहळ्यात सलमानची बहीण अर्पिता खान, तिचा पती आयुष शर्मा, त्याची आई सलमा खान आणि सावत्र आई हेलन यांनी हजेरी लावली होती. सलमानने कुटुंबाबरोबर वाढदिवसाचा केक कापला, तो व्हिडीओ सोशल मीडियावर खूप व्हायरल झाला होता. या सेलिब्रेशनमध्ये नीता अंबानी आणि मुकेश अंबानी देखील सलमानसाठी टाळ्या वाजवताना दिसले होते. बॉलीवूडमधील इतर पाहुण्यांमध्ये रितेश देशमुख व जिनिलीया डिसुझा यांचा समावेश होता.वाढदिवसाच्या सेलिब्रेशननंतर दबंग खान अनंत अंबानी व राधिका मर्चंटबरोबर एका मॉलमध्ये दिसला होता. त्याचे मॉलमधील काही व्हिडीओ व्हायरल झाले होते. ज्यात तो चाहत्यांना अभिवादन करताना दिसत होता. कामाबद्दल बोलायचं झाल्यास सलमान खान ए.आर. मुरुगदास दिग्दर्शित आणि साजिद नाडियादवालाची निर्मिती असलेल्या ‘सिकंदर’ या बहुप्रतिक्षित चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटात रश्मिका मंदाना, काजल अग्रवाल, सत्यराज, शर्मन जोशी आणि प्रतीक बब्बर यांच्यासह अनेक कलाकारांची मांदियाळी आहे.

## अनुरागने घेतला मुंबई सोडण्याचा निर्णय

चित्रपट दिग्दर्शक अनुराग कश्यपने बॉलीवूडच्या सद्यस्थितीबद्दल निराशा व्यक्त केली आहे. तसेच चांगल्या कलाकृतींच्या निर्मितीसाठी तो मुंबई सोडून दाक्षिणात्य सिनेसृष्टीकडे जाण्याचा विचार करतोय, असा खुलासा त्याने केला. अनुरागने हिंदी चित्रपटसृष्टीतील नफ्याची मानसिकता, रीमेक बनवणं आणि स्टार मेकिंग संस्कृतीवर टीका केली आहे. यामुळे सर्जनशीलता कमी होते आणि कलाकृतींमध्ये नाविन्य नसतं, असं मत अनुरागने मांडलं. अनुराग कश्यप हॉलीवूड रिपोर्टरशी बोलताना म्हणाला, “आता बाहेर जाऊन प्रयोग करणं माझ्यासाठी अवघड आहे; कारण त्यासाठी खूप पैसा लागतो. निर्माते नफा आणि मार्जिनचा विचार करतात.

## मुलांवर संस्कार होण्यासाठी



बॉलीवूडमध्ये आपल्या अभिनयानं नेहमीच चाहत्यांच्या पसंतीची अभिनेत्री राहिलेल्या प्रियंका चोप्रानं हॉलीवूडमध्ये देखील दमदारपणे आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. हॉलीवूडमध्ये तिच्या चाहत्यांची संख्या मोठी आहे. सध्या विदेशात स्थायिक असणाऱ्या प्रियंकाच्या आईनं कुटूंब पद्धतीवर केलेले भाष्य चर्चेत आले आहे. प्रियंका ही अमेरिकेमध्ये तिचा पती निक जोनास याच्यासोबत राहते आहे.तिला मालती नावाची मुलगी आहे. २०१८ मध्ये तिनं निकसोबत लग्न केले होते. गेल्या काही दिवसांपासून प्रियंका आणि तिचा पती निक हे वेगवेगळ्या कारणामुळे चर्चेत आले आहे. हॉलीवूडमधील प्रतिष्ठेच्या ऑस्कर सोहळ्यामध्ये सहभागी होण्याची संधी हा दोन्ही सेलिब्रेटींना मिळाली होती. त्याची बॉलीवूडमध्ये चर्चा झाली होती. प्रियंका चोप्राची आई मधू चोप्रा यांनी सध्या एकत्र आणि विभक्त कुटूंब पद्धतीवर केलेलं भाष्य हे नेटकऱ्यांच्या चर्चेत आले आहे. डॉक्टर मधू चोप्रा या सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असणाऱ्या सेलिब्रेटी आहेत. त्यांनी काही दिवसांपूर्वी प्रियंका चोप्राचे लहानपण आणि विभक्त कुटूंब पद्धती, त्याचा मुलांवर होणारा परिणाम, संस्कार यावर मोकळेपणानं प्रतिक्रिया दिली होती.

## माझ्या सुरक्षारक्षकांनी त्यांना मारलं

गायक मिका सिंगने कमाल आर खान (KRK) केआरके विरोधात वादग्रस्त आरोप केले असून, त्यावर प्रतिक्रिया देत केआरकेने आता त्याच्या यूट्यूब चॅनेलवर एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. या व्हिडिओमध्ये त्याने मिकावर जोरदार टीका केली आहे आणि कपिल शर्माबरोबर झालेल्या वादाबद्दल भाष्य केले आहे. मिकाने एका मुलाखतीत सांगितले की, त्याने कपिल शर्माला केआरकेच्या घरी नेले होते, जिथे त्यांनी गोंधळ घातला होता. केआरकेने त्याच्या व्हिडीओमध्ये म्हटले, “मिका हा गाढव आहे, तो अशिक्षित आणि बेशिस्त आहे, तरी स्वतःला गायक म्हणवतो. मिका म्हणाला होता की, मी त्याला दुबईत भेटलो होतो आणि त्याने माझ्याशी गैरवर्तन केलं. त्यानंतर त्याने सांगितलं की, त्याला काहीही आठवत नाही. होय, तो दुबईत मला भेटला होता, पण त्यानंतर सतत मला कॉल करत राहिला, म्हणून मी त्याला घरी बोलावलं. मात्र, तो आला नाही. त्याच्या मॅनेजरकडून मला समजलं की, मिकाला वाटलं की मी त्याचं अपहरण करीन. या विशेष कर्तृत्व नसलेल्या माणसाचं अपहरण करून मला काय मिळणार? तो माझ्यालेखी काहीच नाहीये.”केआरके पुढे म्हणाला, “त्याच्या मॅनेजरने मला त्याच्या हॉटेलवर बोलावले. तिथे हनी सिंगही होता, ज्याचं मोठं सूट (मोठा रूम होता), तर मिकाचा छोटासा रूम होता. मिकाने मला त्याच्या शोला यायचे आमंत्रण दिलं , पण मी मला काम आहे असं सांगून गेलो नाही.”मुंबईतील एका घटनेचा उल्लेख करत केआरके म्हणाला की, त्याच्या सुरक्षारक्षकांनी मिका आणि कपिलला त्याच्या घरी मद्यधुंद अवस्थेत आल्यावर चापट मारली होती.

## माधुरी दीक्षितने सांगितला 'पंचक'चा अनुभव



डॉ. श्रीराम नेने आणि माधुरी दीक्षित नेने निर्मित 'पंचक' हा चित्रपट प्रदर्शित व्हायला अवघे काही दिवस असतानाच आता या चित्रपटाचा आणखी एक उत्कंठावर्धक ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. गेल्या काही दिवसांपासून या चित्रपटाची सर्वत्र जोरदार चर्चा सुरु आहे. इतकेच नाही तर बॉलिवूडमधील काही नामवंत कलाकारांनी 'पंचक'च्या ट्रेलरचे भरभरून कौतुक केले आहे. नवीन वर्षात प्रदर्शित होणारा हा चित्रपट मल्टीस्टारर आहे. अशातच चित्रपटाचा नवीन ट्रेलर भेटीला आलाय. 'पंचक'च्या पहिल्या ट्रेलरने खूप उत्सुकता निर्माण केली होती. त्यात आता या दुसऱ्या ट्रेलरने अधिक भर टाकली आहे. खोतांच्या घराला पंचक लागल्याने 'आता कोणाचा नंबर ?' हा प्रश्न अवघ्या घराला पडलेला असतानाच, अनेक जण आपापल्या परीने हे संकट टाळण्याचा प्रयत्न करत आहेत. या सगळ्या गोंधळात घरात सर्कस होत आहे, ऑपेराही होताना दिसत आहे. त्यामुळे आता पुढे काय होणार हे, याचे उत्तर प्रेक्षकांना ५ जानेवारी रोजी मिळणार आहे. कथा, दिग्दर्शन, कलाकार, संगीत या सगळ्याच चित्रपटाच्या जमेच्या बाजू आहेत. चित्रपटाबद्दल माधुरी दीक्षित नेने म्हणतात, "या चित्रपटाच्या क्रिएटिव्ह बाबींमध्ये मी विशेष लक्ष घातले आहे. पडद्यावरील आणि पडद्यामागील प्रत्येकाची निवड ही योग्य आहे. चित्रपट पाहताना याचा प्रत्यय प्रेक्षकांनाही नक्कीच येईल. प्रत्येक कलाकार त्या व्यक्तिरेखेत चपखल बसला आहे.

# आयुष म्हात्रेचा विश्वविक्रम!

## यशस्वी जैस्वालला मागे टाकत केला खास पराक्रम

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**असे म्हणतात की वयाचा तुमच्या प्रतिभेशी काहीही संबंध नसतो. तुमच्यात प्रतिभा असेल तर तुम्ही लहान वयातच सर्वोत्तम कामगिरी करू शकता. अलीकडेच मुंबईच्या १७ वर्षीय खेळाडूने हे सिद्ध केले आहे. मुंबई संघाचा १७ वर्षीय खेळाडू आयुष म्हात्रेने विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत धुमाकूळ घातला आहे. त्याने नागालँडविरुद्ध ऐतिहासिक शतक झळकावले आहे.**



वास्तविक, २०२४ च्या शेवटच्या दिवशी म्हणजेच आज (३१ डिसेंबर) रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमच्या खेळपट्टीवर मुंबई आणि नागालँड यांच्यात विजय हजारे ट्रॉफी सामना खेळला जात आहे. या सामन्यात नागालँड संघाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी निवडली. प्रथम फलंदाजी करणाऱ्या मुंबई संघाच्या डावाची सुरुवात आयुष म्हात्रे आणि अंगक्रिश रघुवंशी यांनी केली. या दोघांनी मुंबई संघाला दमदार सुरुवात करून दिली आणि दोघांमध्ये पहिल्या विकेटसाठी १५६ धावांची भागीदारी झाली. आयुष बाद झाला, पण म्हात्रेने आक्रमक फलंदाजी सुरूच ठेवली. आयुष म्हात्रे वयाच्या अवघ्या १७ वर्षे आणि १६८ दिवसांत लिस्ट ए क्रिकेटमध्ये १५० हून अधिक धावा करणारा जगातील सर्वात तरुण खेळाडू ठरला. त्याने यशस्वी जैस्वालचा यापूर्वीचा विक्रम मोडला. यशस्वीने २०१९ मध्ये झारखंडविरुद्ध हा पराक्रम केला होता. तेव्हा त्याचे वय १७ वर्षे आणि २९१ दिवस होते. आयुष म्हात्रेने ११७ चेंडूंचा सामना करताना १८१ धावा केल्या. १७ वर्षीय आयुषने लिस्ट-ए क्रिकेटमधील पहिले शतक झळकावले. मात्र, त्याचे दुहेरी शतक अवघ्या १९ धावांनी हुकले. या कालावधीत त्याचा स्ट्राईक रेट १५४ पेक्षा जास्त होता आणि त्याच्या खेळीत एकूण ११ षटकार आणि १५ चौकारांचा समावेश होता. आयुषशिवाय आंगक्रिशने ५६ धावांची खेळी खेळली. त्याचवेळी कर्णधार शार्दुल ठाकूरने ७३ धावांची नाबाद खेळी केली. अशाप्रकारे मुंबई संघाने ५० षटकांत ७ गडी गमावून ४०३ धावा केल्या. लिस्ट-ए क्रिकेटमध्ये मुंबई संघाची ही दुसरी सर्वोच्च धावसंख्या ठरली. आयपीएल २०२५ च्या लिलावात आयुष म्हात्रेला खरेदी करण्यात कोणत्याही फ्रँचायझीने स्वारस्य दाखवले नाही. लिलावापूर्वी आयुषला सीएसकेने ट्रायलसाठी बोलावले होते. असे मानले जात होते की हा १७ वर्षांचा खेळाडू धोनीच्या संघात सामील होईल, परंतु जेव्हा त्याला लिलावात समाविष्ट करण्यात आले, तेव्हा त्याच्यावर कोणत्याही संघाने बोली लावली नाही. आता त्याच्या शतकी खेळीनंतर सर्वच फ्रँचायझींना पश्चाताप होत असेल. अलीकडेच मुंबईच्या १७ वर्षीय खेळाडूने हे सिद्ध केले आहे. मुंबई संघाचा १७ वर्षीय खेळाडू आयुष म्हात्रेने विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत धुमाकूळ घातला आहे. त्याने नागालँडविरुद्ध ऐतिहासिक शतक झळकावले आहेम्हणजेच आज रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमच्या खेळपट्टीवर मुंबई आणि नागालँड यांच्यात विजय हजारे ट्रॉफी सामना खेळला जात आहे.

### दुहेरी शतक अवघ्या 19 धावांनी हुकले

या सामन्यात नागालँड संघाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी निवडली. प्रथम फलंदाजी करणाऱ्या मुंबई संघाच्या डावाची सुरुवात आयुष म्हात्रे आणि अंगक्रिश रघुवंशी यांनी केली. या दोघांनी मुंबई संघाला दमदार सुरुवात करून दिली आणि दोघांमध्ये पहिल्या विकेटसाठी १५६ धावांची भागीदारी झाली. आयुष बाद झाला, पण म्हात्रेने आक्रमक फलंदाजी सुरूच ठेवली.आयुष म्हात्रे वयाच्या अवघ्या १७ वर्षे आणि १६८ दिवसांत लिस्ट ए क्रिकेटमध्ये १५० हून अधिक धावा करणारा जगातील सर्वात तरुण खेळाडू ठरला. त्याने यशस्वी जैस्वालचा यापूर्वीचा विक्रम मोडला. यशस्वीने २०१९ मध्ये झारखंडविरुद्ध हा पराक्रम केला होता. तेव्हा त्याचे वय १७ वर्षे आणि २९१ दिवस होते. आयुष म्हात्रेने ११७ चेंडूंचा सामना करताना १८१ धावा केल्या. १७ वर्षीय आयुषने लिस्ट-ए क्रिकेटमधील पहिले शतक झळकावले. मात्र, त्याचे दुहेरी शतक अवघ्या १९ धावांनी हुकले.

# गावस्करांचा भारतीय महत्त्वाचा सल्ला

## ऑस्ट्रेलियाने पाच सामन्यांच्या मालिकेत 2-1 ने आघाडी घेतली

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मेलबर्न येथील बॉक्सिंग डे कसोटी सामन्यात भारता ऑस्ट्रेलियाविरुद्ध १८४ धावांनी दारुण पराभव पत्करावा लागला. यानंतर भारतीय संघातील वरिष्ठ खेळाडूंवर सातत्याने टीका होत आहे. विराट-रोहितसारखे वरिष्ठ खेळाडू ऑस्ट्रेलियात आव्हान पेलण्यात आणि आपल्या बॅटने धावा करण्यात अपयशी ठरले, ही वस्तुस्थिती लपवता येणार नाही.**




भारतीय कर्णधार रोहितसाठी निवृत्तीचा मुद्दा आधीच चर्चेचा विषय असताना, ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर विराट आपली एकमेव चूक सुधारण्यात अपयशी ठरल्यामुळे त्याच्यावरही टीका होत आहे. अशात भारताचे महान खेळाडू सुनील गावस्कर यांनी निवडकर्त्यांना कोहली आणि रोहितसारख्या भारतीय संघातील वरिष्ठ खेळाडूंच्या भवितव्याचा विचार करण्याचा सल्ला दिला आहे.विशेषतः कोहलीबद्दल बोलताना गावस्कर म्हणाले की, “बाहेर जाणाऱ्या चेंडूंवर वारंवार बाद होण्यामागे त्याचा फूटवर्क जबाबदार होता. इंडिया टुडेशी बोलताना सुनील गावस्कर म्हणाले की, “कोहलीचा पाय चेंडूच्या दिशेने जात नाही, पाय सरळ खेळपट्टीवर राहतो. जर पाय चेंडूच्या दिशेने जास्त गेला, तर तुम्हाला चेंडू मधून मारण्याची संधी अधिक असते. कारण पाय हलत नसल्यामुळे, तुम्ही चेंडूपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत नाही आणि आऊट होता.”आता वरिष्ठ खेळाडूंसह पुढे जाण्याच्या मुद्द्यावर, बीसीसीआय, निवड समितीचे प्रमुख अजित आगरकर आणि इतर निवडकर्त्यांना याबाबत निर्णय घ्यावा लागेल.

### खालच्या फळीला दोष का द्यायचा?

कारण पहिल्या फळीत वरिष्ठ खेळाडूंकडून अपेक्षित योगदान लाभलं नाही . सुनील गावस्कर पुढे म्हणाले, “हे सर्व निवडकर्त्यांवर अवलंबून आहे. जे योगदान अपेक्षित होतं तसं झालं नाही. पहिल्या फळीला योगदान द्यावे लागेल. जर पहिली फळी योगदान देत नसेल, तर खालच्या फळीला दोष का द्यायचा?”सुनील गावस्कर पुढे म्हणाले, “वरिष्ठ खेळाडूंनी जे योगदान दिले पाहिजे होते, ते त्यांनी खरोखरच दिले नाही. त्यांना फक्त आज फलंदाजी करायची होती आणि आणि सिडनीमध्ये लढण्यासाठी टिकून राहायचे होते.